ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५३ • बुधवार दि.१८ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

कापूस-तुरीच्या आड गांजाची शेती

माहुर तालुक्यात शेतातील ६० लाखांचा गांजा जप्त



सरफराज दोसानी

माहूर:माहूर तालुक्यात गांजाच्या बेकायदेशीर लागवडीचा काळा धंदा किती खोलवर रुजला आहे, याचे धक्कादायक चित्र सलग दोन दिवसांत समोर आलेल्या पोलीस कारवायांमधून स्पष्ट होत आहे. दहेगाव येथे १६ नोव्हेंबर रोजी गांजाच्या शेतीचा पर्दाफाश झाल्यानंतर अवघ्या २४ तासांत, १७ नोव्हेंबर रोजी दत्तमांजरी शिवारात पोलिसांनी पुन्हा धडक कारवाई केली. कापूस आणि तुरीच्या पिकांच्या आड लपवून जोपासलेल्या गांजाच्या शेतीवर पोलिसांनी छापा टाकत तब्बल १२० किलो ४५० ग्रॅम गांजा जप्त केला. या मुद्देमालाची किंमत ६० लाख २२ हजार ५०० रुपये असल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सुनील नामदेव पवार याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दत्तमांजरी शिवारातील शेतगट क्रमांक ४५/३ मध्ये खरीप हंगामातील कापूस आणि तुरीच्या पिकांमध्ये गांजाची लागवड करून त्याची जोपासना केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने संबंधित शेतात धाड टाकली. यावेळी कापूस आणि तुरीच्या पिकांच्या आड गांजाची लागवड केल्याचे उघड झाले. सदर शेत सुनील नामदेव पवार (वय ४०) यांच्या मालकीचे असल्याचे समोर आले. पोलिसांनी घटनास्थळावरून १२० किलो ४५० ग्रॅम गांजा जप्त केला. प्रतिकिलो ५० हजार रुपये या दराने त्याची एकूण किंमत ६० लाख २२ हजार ५०० रुपये असल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले. पोलीस हवालदार गजानन चौधरी यांच्या तक्रारीवरून पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके करीत आहेत. पान ४ वर

'लश्कर'चा कमांडर लतीफ भट चकमकीत ठार



कुलगाममध्ये सुरक्षा दलांची मोठी कारवाई

श्रीनगर:जम्मू-काश्मीर मधील दहशतवादविरोधी मोहिमेत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. कुलगाम जिल्ह्यात बुधवारी (१८ नोव्हेंबर) पहाटे झालेल्या चकमकीत लश्कर-ए-तोयबाचा कुख्यात कमांडर लतीफ अहमद भट याचा खात्मा करण्यात आला. मशिदीत लपून बसलेल्या लतीफला सुरक्षा दलांनी आत्मसमर्पण करण्याची संधी दिली; मात्र त्याने शरण येण्यास नकार दिल्यानंतर झालेल्या गोळीबारात तो ठार झाला. सीआरपीएफच्या चौकीवरील हल्ल्यासह काश्मीरमधील अनेक दहशतवादी कारवायांमध्ये त्याचा सहभाग असल्याचा आरोप होता.

मंगळवारी रात्री उशिरा सुरक्षा दलांना कुलगाममधील जंगलपोरा परिसरात दहशतवादी लपून बसल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर लष्कर आणि इतर सुरक्षा यंत्रणांनी परिसराची नाकेबंदी करत शोधमोहीम हाती घेतली. बुधवारी पहाटे सुमारे चार वाजण्याच्या सुमारास सुरक्षा दलांचा दहशतवाद्यांशी सामना झाला. परिसराची घेराबंदी केल्यानंतर लश्करचा कमांडर लतीफ भट मशिदीत लपून बसल्याचे स्पष्ट झाले. सुरक्षा दलांनी त्याला बाहेर येऊन आत्मसमर्पण करण्याचे आवाहन केले. मात्र, त्याने शरणागती पत्करण्यास नकार दिला. त्यानंतर दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू झाला. या चकमकीत लतीफ भट ठार झाला. त्याच्या मृत्यूमुळे कुलगाम परिसरातील दहशतवादी नेटवर्कला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.दरम्यान, ११ नोव्हेंबर रोजी कुलगाम जिल्ह्यातील नौपुरा मीर बाजार येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या चौकीवर दोन सशस्त्र दहशतवाद्यांनी गोळीबार केला होता. या हल्ल्यात तीन जवान जखमी झाले होते. या हल्ल्यापूर्वी लतीफ भट आणि उमर निसार दार यांनी मीर बाजार, अखरान, हब्लिश आणि किलम यांसह विविध ठिकाणांची टेहळणी केल्याचा तपास यंत्रणांचा संशय होता. हल्ल्यानंतर उमर निसार दार फरार झाला होता.लतीफ भट हा कुलगाम जिल्ह्यातील खेवन चादर गावचा रहिवासी होता. नोव्हेंबर २०२० मध्ये त्याने कुटुंब सोडून लश्कर-ए-तोयबामध्ये प्रवेश केल्याची माहिती आहे. त्यानंतर काश्मीरच्या विविध भागांत छोट्या-मोठ्या दहशतवादी कारवायांमध्ये तो सक्रिय होता. स्थानिक नागरिकांमध्ये मिसळून वावरण्याची त्याची पद्धत असल्याने सुरक्षा यंत्रणांसाठी त्याचा शोध घेणे आव्हानात्मक ठरत होते.स्थलांतरित मजुरांच्या हत्येसह अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्याचा पान ४ वर

नांदेडमध्ये गारठा वाढला

नांदेड/प्रतिनिधी-गेल्या दोन दिवसांपासून नांदेड शहर व परिसरात अचानक सकाळी थंडी व दुपारी कडक ऊन असे वातावरण निर्माण झाले आहे. याचे आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. सर्दी, खोकला, तापीच्या आजाराची लागण मोठ्या प्रमाणात होत आहे.

यावर्षी पाऊस कमी झाल्याने ऑक्टोबर हिट मोठ्या प्रमाणात जाणवली. दिवाळीच्या काळात दरवर्षी गारठा जाणवतो परंतु यावर्षी ढगाळ वातावरणामुळे उकाडा जाणवत होता. सोमवारपासून वातावरणात बदल झाले आहेत. पहाटे थंडी व दुपारी ऊन असे वातावरण झाले आहे.

जुन्या निकालांचा चुकीचा अर्थ;शिंदे गटाचा आक्षेप

शिवसेना पक्ष आणि चिन्हाची सुनावणी,आता ठाकरेंच्या प्रतीवादाकडे लक्ष



नवी दिल्ली:सर्वोच्च न्यायालयाच्या जुन्या निकालांचा ठाकरे गटाकडून चुकीचा अर्थ लावला जात असल्याचा दावा शिंदे गटाचे ज्येष्ठ विधिज्ञ ध्रुव मेहता यांनी केला. बुधवारी झालेल्या सुनावणीत त्यांनी विविध न्यायालयीन निकालांचा संदर्भ देत आपली बाजू मांडली. दरम्यान, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी मेहता यांना आजच युक्तिवाद पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्याचे निर्देश दिल्याने पुढील सुनावणीत ठाकरे गटाकडून होणाऱ्या प्रतिवादाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात आज सलग दुसऱ्या दिवशी सुनावणी पार पडली. सुरू असलेल्या सुनावणीत शिंदे गटाने ठाकरे गटाच्या युक्तिवादावर आक्षेप घेतला आहे. सुनावणीदरम्यान मेहता यांनी बाळासाहेब पाटील प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ दिला. या निकालाचा ठाकरे गटाकडून चुकीचा अर्थ लावला जात असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच कर्नाटकातील २०१९ मधील राजकीय घडामोडी आणि सुभाष देसाई प्रकरणातील न्यायालयीन निरीक्षणांचाही आधार घेतला.पक्षांतर्गत मतभेद आणि पक्षांतर या वेगवेगळ्या बाबी असल्याचे स्पष्ट करताना, विधिमंडळ पक्षाच्या बैठकीला अनुपस्थित राहणे म्हणजे राजकीय पक्षाचे सदस्यत्व स्वेच्छेने सोडणे नव्हे, असा युक्तिवाद पान ४ वर

इसापूर उजवा कालवा व सिंचन व्यवस्थेत अनधिकृत हस्तक्षेप केल्यास कठोर कारवाई



नांदेड/प्रतिनिधी-रब्बी व उन्हाळी हंगाम २०२६-२७ मध्ये उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर उजवा कालव्याच्या कालवा वितरण प्रणालीद्वारे होणाऱ्या सिंचन व बिगर सिंचन पाणीपुरवठ्याचे नियोजन सुरळीत आणि नियंत्रित पद्धतीने व्हावे, तसेच उपलब्ध पाण्याचे न्याय्य पद्धतीने वितरण व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर उजव्या कालव्याचे रब्बी हंगाम २०२६-२७ मधील पहिले कालवा आवर्तन दि. १ नोव्हेंबर पासून सुरू करण्यात आले आहे. या कालव्याद्वारे नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर, भोकर, मुदखेड, उमरी, हदगाव व हिमायतनगर या तालुक्यांतील गावांना सिंचनाचा लाभ मिळतो. तसेच हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी व वसमत तालुक्यांनाही या कालव्याचा लाभ होतो. मात्र, सद्यस्थितीतील दुष्काळी परिस्थितीमुळे सिंचनाच्या पाण्याची मागणी वाढली असून, उपलब्ध पाण्याचे नियोजनबद्ध वितरण करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर कालव्यावरील काटनियामक (सी.आर.), एस्केप व इतर नियंत्रण संरचनांमध्ये अनधिकृत हस्तक्षेप करणे, कालव्याचे दरवाजे परस्पर उघडणे अथवा बंद करणे, कालव्यात अडथळे निर्माण करणे, अनधिकृत पाणी उपसा करणे, कालव्याचे नुकसान करणे तसेच पाणीवाटप करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यास मनाई करण्यात आली आहे. हे आदेश दि. १८ नोव्हेंबर रोजीपासून ते दि. १६ जानेवारी २०२७ रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील.या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक, नांदेड व संबंधित पोलीस विभागाने आवश्यक प्रतिबंधात्मक कारवाई करावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. आदेशाची व्यापक प्रसिद्धी देण्याची जबाबदारी संबंधित विभागांना सोपविण्यात आली असून, सर्व संबंधितांनी आदेशाचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

एसआरए घोटाळ्यात ४० हजार कोटींचे नुकसान

खा.राऊतांचा मुख्यमंत्र्यांवर घणाघाती आरोप

मुंबई/प्रतिनिधी- एसआरए च्या नियमांत न बसणारे सुमारे ३०० प्रकल्प बिल्डरांच्या फायद्यासाठी राबविले जात असून, यामुळे सरकारचे ४० हजार कोटींचे नुकसान झाल्याचा गंभीर आरोप करीत मुख्यमंत्री फडणवीसांवर टीकास्त्र डागले आहे.

मुंबईतील एसआरए घोटाळ्यावरून शिवसेनेचे खा. संजय राऊत यांनी एसआरए घोटाळा संपलेला नाही. मी शांत बसणार नाही. पुढचा बॉम्ब टाकेन, तेव्हा मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागेल, असा इशारा राऊत यांनी माध्यमांशी बोलताना दिला. संबंधित प्रकल्पांना स्थगिती देऊन चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली. दरम्यान, राज्यातील दुष्काळ निवारणासाठी ४० हजार कोटींची गरज असताना सरकारकडे निधी नसल्याची टीका करत त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या आर्थिक धोरणांवरही प्रश्न उपस्थित केले. उदय सामंत आणि भास्कर जाधव यांच्या भेटीवरून सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांनाही त्यांनी फारसे महत्त्व दिले नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त श्रद्धांजलीवरून सुरू असलेल्या राजकीय टीकेला उत्तर देताना, कोणी श्रद्धांजली वाहिली नाही म्हणून बाळासाहेबांचे मोठेपण कमी होत नाही, असेही राऊत म्हणाले.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते २० रोजी कंधार येथे उपजिल्हा रुग्णालयासह विविध विकासकामांचे लोकार्पण

आ.प्रताप पाटील चिखलीकर यांची माहिती



नांदेड/प्रतिनिधी-राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्राताई पवार या २० नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात कंधार येथील विविध विकासकामांचे त्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात येणार असून, श्री शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर आयोजित जाहीर सभेलाही त्या संबोधित करणार आहेत. या सभेला सुमारे २० हजार नागरिक उपस्थित राहतील, अशी माहिती आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आज (बुधवार) एका पत्रकार परिषदेत बोलतांना दिली.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यावर विशेष प्रेम होते. त्यांच्या पुढाकारातून या भागातील विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला होता. त्यांच्या निधनानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचे काम उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वातून होत असल्याचे आ.चिखलीकर यांनी सांगितले. कंधार येथे शंभर खाटांचे अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात आले असून, महाराष्ट्रातील मॉडेल रुग्णालय म्हणून विकसित होण्याच्या दृष्टीने येथे विविध आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या रुग्णालयाचे लोकार्पण सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते होणार आहे. याशिवाय कंधार नगर परिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या शांतिदूत गोविंदराव चिखलीकर उद्यानाचेही लोकार्पण करण्यात येणार आहे. या उद्यानाच्या विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. येथे मुलांसाठी खेळण्याची साधने, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळ्याची व्यवस्था तसेच अन्य सुविधांची निर्मिती करण्यात आली आहे. कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघातील प्रशासकीय कामकाजाला गती मिळावी, यासाठी दोन कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीचेही उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे.

या सर्व विकासकामांच्या लोकार्पणानंतर श्री शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर जाहीर सभा होणार असून, उपमुख्यमंत्री पवार यावेळी उपस्थितांना संबोधित करणार आहेत. या सभेसाठी किमान २० हजार नागरिक उपस्थित राहतील, असा विश्वास आमदार चिखलीकर यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्री मेघना बोर्डीकर आणि सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले उपस्थित राहणार आहेत. याशिवाय नांदेड जिल्ह्यातील सर्व आमदार आणि खासदारांनाही कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. पत्रकार परिषदेला माजी आ.मोहनराव हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, दिलीपराव धर्माधिकारी, प्रवीण पाटील चिखलीकर, जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, बाळासाहेब रावणगावकर, नागनाथ घिसेवाड, माधव पावडे, शिरीष गोरठेकर, डॉ. उत्तम सोनकांबळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मराठवाड्याच्या जलनियोजनाचे अपयश कधी थांबणार?

मराठवाड्याच्या वाट्याला निसर्गाने जणू विरोधाभासच दिला आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, कधी पाण्यासाठी वणवण तर कधी पुराच्या पाण्याने शेतीचे अतोनात नुकसान! विशेष म्हणजे मागील सलग तीन वर्षे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. अनेक भागांत ओल्या दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण झाली. शेतजमिनी पाण्याखाली गेल्या, पिके उद्ध्वस्त झाली, नद्या-नाल्यांना पूर आले. त्यानंतर अवकाळी पावसानेही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात पाऊस होऊनही आज मराठवाड्यातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. हा विरोधाभास केवळ निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम नसून जलनियोजनातील गंभीर त्रुटींचे वास्तव उघड करणारा आहे. प्रश्न असा आहे की, सलग तीन वर्षे मोठ्या प्रमाणात पाऊस झाला, धरणे भरली, नद्या दुथडी भरून वाहिल्या, मग हे पाणी गेले कुठे? पावसाचे पाणी अडविण्यासाठी आणि जमिनीत मुरविण्यासाठी आवश्यक व्यवस्था निर्माण करण्यात आपण कमी पडलो का? पावसाचे पाणी वाहून जात असताना त्याचा साठा करण्यासाठी पुरेशा उपाययोजना का झाल्या नाहीत? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची वेळ आता आली आहे. मराठवाड्यातील पाणीटंचाई ही केवळ कमी पावसामुळे निर्माण झालेली समस्या नाही. पाऊस पडतो, पण त्याचे नियोजन होत नाही, ही खरी शोकांतिका आहे. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी नदी-नाल्यांमधून वाहून जाते. अनेक ठिकाणी पुराचे पाणी शेती आणि गावांमध्ये शिरून नुकसान करते. मात्र तेच पाणी अडविण्यासाठी आवश्यक बंधारे, शेततळी, नाला खोलीकरण आणि जलसंधारणाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या जात नाहीत. परिणामी पावसाळ्यात पाण्याचा महापूर आणि उन्हाळ्यात पाण्याचा दुष्काळ, असे चित्र दरवर्षी पाहायला मिळते. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, धाराशिव, बीड, जालना आणि छत्रपती संभाजीनगर या आठ जिल्ह्यांमध्ये पाणीटंचाईचे स्वरूप वेगवेगळे असले तरी समस्या समान आहे. गोदावरी नदी, विष्णुपुरी, जायकवाडी, येलदरी, सिद्धेश्वर आणि माजलगाव यांसारखे जलप्रकल्प उपलब्ध असतानाही पाण्याचे समन्यायी वितरण आणि शाश्वत सिंचन व्यवस्था हा प्रश्न कायम आहे. धरणात पाणी असणे आणि ते शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. कालव्यांची दुरवस्था, पाण्याची गळती आणि अपूर्ण सिंचन व्यवस्था यामुळे उपलब्ध जलसाठ्याचाही पुरेपूर उपयोग होत नाही. यंदा निर्माण झालेली पाणीटंचाई ही शासन आणि प्रशासनासाठी धोक्याची घंटा आहे. मागील तीन वर्षांच्या अतिवृष्टीतून आपण काहीच धडा घेतला नाही, असेच या परिस्थितीवरून दिसते. पावसाचे पाणी साठविण्यासाठी आणि त्याचा शेतीसाठी उपयोग करण्यासाठी व्यापक नियोजन झाले असते, तर आज अनेक गावांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागला नसता. सिंचनाच्या अपुऱ्या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना पुन्हा एकदा पावसावर अवलंबून राहावे लागत आहे. पावसाळ्यात नुकसान आणि उन्हाळ्यात टंचाई, या दुहेरी संकटातून शेतकरी बाहेर पडणार तरी कधी? आता केवळ मोठ्या धरणांच्या घोषणा किंवा महत्त्वाकांक्षी जलप्रकल्पांच्या आराखड्यांवर समाधान मानून चालणार नाही. गावागावांत 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. प्रत्येक गावाचा स्वतंत्र जलआराखडा तयार करून उपलब्ध पाणी, भूजल पातळी, लोकसंख्या आणि शेतीची गरज यांचा अभ्यास केला पाहिजे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी लघुसिंचन प्रकल्प, साठवण तलाव, शेततळी, बंधारे आणि नाला खोलीकरणाची कामे प्राधान्याने झाली पाहिजेत. अस्तित्वात असलेल्या कालव्यांची दुरुस्ती करून सिंचन व्यवस्थेतील गळती रोखली पाहिजे. ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. जलनियोजन हा केवळ जलसंपदा विभागाचा विषय नसून संपूर्ण प्रशासन आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. शासनाने निधी उपलब्ध करून देण्याबरोबरच कामांच्या गुणवत्तेवर आणि प्रत्यक्ष परिणामांवर लक्ष ठेवले पाहिजे. लोकप्रतिनिधींनीही पाणीप्रश्नाला राजकीय प्रतिष्ठेचा विषय न बनवता मराठवाड्याच्या विकासाचा केंद्रबिंदू मानले पाहिजे. मराठवाड्याला पावसाची कमतरता आहे की; पावसाच्या पाण्याचे नियोजन करण्याची इच्छाशक्ती कमी पडते आहे, याचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. सलग तीन वर्षे अतिवृष्टी होऊनही पाणीटंचाई निर्माण होत असेल, तर ही परिस्थिती केवळ दुर्दैव म्हणून स्वीकारता येणार नाही. निसर्ग पाणी देतो; मात्र ते जतन करण्याची जबाबदारी माणसाची आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी उन्हाळ्यात नागरिकांच्या घशाला कोरड पाडत असेल, तर दोष पावसाचा नाही, तर आपल्या नियोजनाचा आहे. मराठवाड्याला आता आश्वासनांचे नव्हे, तर ठोस जलनियोजनाचे आणि प्रभावी सिंचन व्यवस्थेचे मॉडेल हवे आहे. कारण पाणी अडले तरच विकास घडेल, शेती टिकेल आणि मराठवाड्याचे भविष्य सुरक्षित होईल!

बालपण सुरक्षित असेल तरच भविष्य सुंदर होईल..!

बालकांचे लैंगिक शोषण रोखणे ही केवळ कायद्याची नव्हे,तर संपूर्ण समाजाची जबाबदारी!

बालपण म्हणजे निरागसतेचा, स्वप्नांचा आणि आनंदाचा काळ! मातीशी खेळताना, शाळेच्या प्रांगणात बागडताना आणि नव्या गोष्टी शिकताना बालकांच्या चेहऱ्यावर उमटणारे हास्य हेच निरोगी समाजाचे खरे वैभव असते. मात्र, याच निरागस बालपणावर जेव्हा लैंगिक शोषण, अत्याचार आणि हिंसाचाराचे सावट पसरते, तेव्हा केवळ एका बालकाचे आयुष्य उद्ध्वस्त होत नाही, तर संपूर्ण समाजव्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. बालकांचे संरक्षण हा केवळ सामाजिक विषय नसून तो मानवी मूल्ये, नैतिकता आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा कस पाहणारा गंभीर प्रश्न आहे.

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानसमृद्ध युगात बालकांच्या सुरक्षिततेची आव्हाने अधिक गुंतागुंतीची झाली आहेत. पूर्वी अनोळखी व्यक्तींपासून सावध राहण्याचा सल्ला दिला जात असे; परंतु वास्तव असे आहे की अनेकदा बालकांच्या परिचयातील व्यक्तींकडूनही अत्याचार होऊ शकतात. घर, शाळा, शिकवणी, क्रीडांगण, धार्मिक स्थळे किंवा सार्वजनिक ठिकाणे अशा कुठल्याही परिसरात बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.मोबाईल, इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे ऑनलाइन छळ, अश्लील संदेश, फसवणूक आणि बालकांच्या प्रतिमांचा गैरवापर यांसारखी नवी संकटेही समोर येत आहेत.

मौन हे अत्याचाराला मिळणारे अप्रत्यक्ष बळ!

बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये सर्वांत मोठी अडचण असते ती म्हणजे भीती, संकोच आणि मौन. अनेक बालके आपल्यासोबत घडलेली घटना सांगण्यास घाबरतात. काहींना अपराधीपणाची भावना निर्माण करून गप्प केले जाते, तर काहींना धमकावले जाते. बदनामीच्या भीतीने कुटुंबीयही अनेकदा तक्रार करण्यास मागेपुढे पाहतात.हीच मानसिकता अत्याचार करणाऱ्यांना बळ देते. त्यामुळे बालकाने काही सांगितल्यास त्याच्यावर विश्वास ठेवणे, त्याला दोष न देणे आणि त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे अत्यंत आवश्यक आहे. बालकाला सुरक्षिततेची हमी देणारा पहिला आधार त्याचे कुटुंब असले पाहिजे.

कायद्याची जाणीव आणि अंमलबजावणी आवश्यक! बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने २०१२ मध्ये 'पॉक्सो' कायदा लागू केला. या कायद्याद्वारे १८ वर्षांखालील बालकांचे लैंगिक अत्याचार, लैंगिक छळ आणि अश्लीलतेपासून संरक्षण करण्याची तरतूद करण्यात आली आहे.बालकांच्या हिताला प्राधान्य देत विशेष न्यायालये, बालस्नेही पद्धतीने जबाब नोंदविणे आणि खटल्यांची सुनावणी यांसारख्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.अशा घटनांची माहिती मिळाल्यास कायद्यानुसार संबंधित यंत्रणेला कळविणे महत्त्वाचे आहे. चाइल्ड हेल्पलाइन १०९८ ही बालकांच्या मदतीसाठी उपलब्ध आहे. तातडीच्या धोक्याच्या प्रसंगी ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधता येतो.



मात्र, कायदे कितीही कठोर असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी, संवेदनशील तपास आणि वेळेत न्याय मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. पीडित बालकाची ओळख गोपनीय ठेवणे, त्याला वारंवार घटनाक्रम सांगण्यास भाग न पाडणे आणि न्यायप्रक्रियेत त्याचा मानसिक छळ होणार नाही याची दक्षता घेणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे.

शाळा असावी सुरक्षिततेची पहिली पाठशाळा!

शिक्षक हा केवळ ज्ञानदान करणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शिल्पकार आणि त्यांच्या सुरक्षिततेचा जागरूक संरक्षकही आहे. शाळांमध्ये वयानुरूप लैंगिक शिक्षण, चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श यातील फरक, वैयक्तिक अवकाश, अनोळखी ऑनलाइन संपर्कांपासून सावधगिरी आणि संकटाच्या वेळी विश्वासू व्यक्तीकडे मदत मागण्याचे धैर्य याबाबत मार्गदर्शन झाले पाहिजे. मात्र, सुरक्षिततेची जबाबदारी केवळ बालकांवर टाकता कामा नये. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वाहनचालक, मदतनीस आणि व्यवस्थापन यांची योग्य पडताळणी, तक्रार निवारण यंत्रणा आणि बालसुरक्षा धोरण असणे आवश्यक आहे.ग्रामीण भागातील पालक, शेतमजूर कुटुंबे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील बालकांपर्यंतही ही जनजागृती पोहोचली पाहिजे.बालकांना भीती दाखवून नव्हे, तर विश्वासात घेऊन सुरक्षिततेचे धडे दिले पाहिजेत. बालकाने एखाद्या व्यक्तीच्या वर्तनाबद्दल अस्वस्थता व्यक्त केली तर त्याकडे दुर्लक्ष न करता गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

पंडित पवळे
शिक्षणयोगी,नांदेड.

डिजिटल जगातही बालकांचे संरक्षण हवे!

आज मोबाईल आणि इंटरनेट हे शिक्षणाचे प्रभावी साधन झाले असले तरी त्याचा अयोग्य वापर बालकांसाठी धोकादायक ठरू शकतो. ऑनलाइन गेमिंग, समाजमाध्यमे आणि अनोळखी व्यक्तींशी होणारा संवाद यामधून बालकांची फसवणूक किंवा छळ होण्याची शक्यता असते.पालकांनी केवळ मोबाईल काढून घेण्यापेक्षा मुलांशी संवाद साधावा, त्यांचा डिजिटल वापर समजून घ्यावा आणि अडचण आल्यास न घाबरता सांगण्याचे वातावरण निर्माण करावे. तंत्रज्ञानाचा वापर सुरक्षित, जबाबदार आणि मर्यादित करण्याचे संस्कार घरातूनच रुजले पाहिजेत.

पीडित बालकाला सहानुभूती नव्हे, सन्मानपूर्वक आधार हवा!

अत्याचारग्रस्त बालकाला केवळ कायदेशीर न्याय मिळणे पुरेसे नाही. त्याला वैद्यकीय उपचार, समुपदेशन, मानसिक आधार, शिक्षणातील सातत्य आणि समाजाकडून सन्मानाची वागणूक मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अशा बालकांकडे दयेच्या किंवा संशयाच्या नजरेने पाहण्याऐवजी त्यांना पुन्हा आत्मविश्वासाने जगण्याची संधी दिली पाहिजे. त्यांची ओळख, छायाचित्रे किंवा वैयक्तिक माहिती समाजमाध्यमांवर प्रसारित करणे टाळले पाहिजे. पीडित बालक हा अपराधी नसतो; अपराधी असतो तो अत्याचार करणारा!

बालसुरक्षित समाजासाठी सामूहिक संकल्प!

बालकांचे संरक्षण करण्यासाठी पालकांनी संवादाची दारे खुली ठेवावीत, शिक्षकांनी संवेदनशीलतेने विद्यार्थ्यांचे निरीक्षण करावे, पोलिसांनी तक्रारींची तत्पर दखल घ्यावी, प्रशासनाने जनजागृती व मदतव्यवस्था मजबूत करावी आणि समाजाने पीडित बालकांच्या पाठीशी उभे राहावे.गावोगावी, शाळाशाळांतून बालहक्क आणि बालसुरक्षा याविषयी नियमित प्रबोधन होणे ही काळाची गरज आहे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, बालकांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य टिकविणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. बालकांना भीतीच्या सावटाखाली नव्हे, तर विश्वासाच्या वातावरणात वाढण्याचा अधिकार आहे. त्यांच्या स्वप्नांना सुरक्षित आकाश मिळाले, तरच उद्याचा समाज सशक्त, संवेदनशील आणि संस्कारित बनेल. बालकांचे बालपण हिरावून घेणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध समाजाने आता मौन सोडून कृतीशील होण्याची वेळ आली आहे. कारण, बालपण सुरक्षित असेल तरच देशाचे भविष्य उज्ज्वल असेल!

नात्यांच्या अनंत प्रवासाची हृदयस्पर्शी गोष्ट...

आजोबा आणि नातवाच्या नात्यातील निरागस गोडवा, जुन्या आणि नव्या विचारांचा संघर्ष, त्यातून निर्माण होणारी गंमत, भावनिक गुंतागुंत आणि शेवटी एकमेकांना समजून घेण्याचा प्रवास आदि अनंत या चित्रपटातून अतिशय सुंदर पद्धतीने उलगडतो. नावाप्रमाणेच आदि अनंत हा नात्यांच्या अनंत भावविश्वाचा अनुभव देतो. या सहजसुंदर चित्रपटावर टाकलेला हा दृष्टिक्षेप..



मराठी चित्रपटसृष्टीत कौटुंबिक नात्यांवर अनेक चित्रपट आले आहेत; मात्र आदि अनंतची मांडणी काहीशी वेगळी आणि तितकीच आपलेपणाची आहे. हा चित्रपट केवळ आजोबा आणि नातवाची गोष्ट सांगत नाही, तर बदलत्या काळात हरवत चाललेला कौटुंबिक संवाद, पिढ्यांमधील अपेक्षा, स्वप्नं, संस्कार आणि भावनिक नात्यांची वीण यांचा संवेदनशील मागोवा घेतो. एका बाजूला आयुष्याचा मोठा अनुभव गाठीशी असलेले अनंतराव, तर दुसऱ्या बाजूला स्वतःच्या स्वप्नांचा पाठपुरावा करणारा आधुनिक विचारांचा आदि! या दोघांच्या स्वभावातील भिन्नता, विचारांमधील मतभेद आणि एकमेकांबद्दल मनात असलेले निस्सीम प्रेम यातून चित्रपटाची खरी गंमत खुलत जाते. प्रत्येक पिढीची जगण्याची पद्धत वेगळी असली, तरी भावनांची भाषा मात्र सारखीच असते, हे चित्रपट ठळकपणे अधोरेखित करतो. अनंतरावांच्या भूमिकेत अशोक सराफ यांनी आपल्या अभिनयाची मोहिनी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. त्यांच्या सहजसुंदर अभिनयाला अनुभवाची विलक्षण जोड लाभली आहे. चेहऱ्यावरचे मिश्किल भाव, संवादफेक, प्रसंगानुरूप विनोद आणि भावनिक क्षणांमधील संयत अभिनय यामुळे अनंतराव ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनात कायमची घर करते. अशोक सराफ यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते व्यक्तिरेखेला कधीही कृत्रिम होऊ देत नाहीत. त्यांच्या अभिनयातील सहजता प्रेक्षकांना खळखळून हसवते, तर पुढच्याच क्षणी एखादा भावनिक प्रसंग डोळ्यांच्या कडा ओलावतो. विनोदाचे बादशाह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ज्येष्ठ अभिनेत्याच्या अभिनयातील भावनिक खोलीही या चित्रपटातून प्रभावीपणे अनुभवायला मिळते.

संकर्षण कऱ्हाडे यांनी साकारलेला आदि हा अनंतरावांच्या व्यक्तिरेखेला पूरक आणि कथेला भावनिक दिशा देणारा महत्त्वाचा दुवा आहे. आधुनिक तरुणाईची मानसिकता, स्वतःची स्वप्नं पूर्ण करण्याची धडपड, महत्त्वाकांक्षा आणि कुटुंबाप्रती असलेली ओढ या सगळ्यांचा सुरेख मेळ त्यांनी आपल्या अभिनयातून साधला आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवादलेखनही संकर्षण यांनी केले आहे. त्यामुळे लेखक आणि अभिनेता या दोन्ही जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पेलल्या आहेत. त्यांच्या लेखणीतून उतरलेले संवाद प्रसंगांना अधिक अर्थपूर्ण करतात. काही संवाद हसवतात, काही विचार करायला भाग पाडतात, तर काही थेट काळजाला भिडतात. विशेषतः दोन पिढ्यांमधील नातेसंबंध व्यक्त करताना त्यांनी साधलेला भावनिक समतोल कौतुकास्पद आहे. अशोक सराफ आणि संकर्षण कऱ्हाडे यांची पडद्यावरील केमिस्ट्री हा चित्रपटाचा खरा आत्मा आहे. त्यांच्यातील नोकझोक, मिश्किल संवाद, मतभेद आणि त्यामागे दडलेली माया प्रेक्षकांना आपलेसे करून जाते.सखी गोखले यांनी आपल्या भूमिकेत सहजता आणि भावनिक समजूतदारपणा दाखवला आहे. वैदेही परशुरामी यांची उपस्थिती कथेला पूरक ठरते. कविता लाड, योगेश शिरसाट, आरव अहीर, श्रीरंग गोडबोले आणि गुरु ठाकूर यांनीही आपल्या भूमिका चोख बजावल्या आहेत. प्रत्येक कलाकाराने व्यक्तिरेखेचा स्वभाव आणि कथेशी असलेले नाते जपले आहे. त्यामुळे चित्रपटातील कौटुंबिक वातावरण अधिक जिवंत आणि विश्वासार्ह वाटते. कलाकारांची ही उत्तम मांदियाळी कथानकाला अधिक समृद्ध करते. दिग्दर्शक महेश लिमये यांनी या चित्रपटातून संवेदनशील दिग्दर्शनाचा प्रत्यय दिला आहे. कथा सांगताना भावनांचा अतिरेक न करता प्रसंगांमधील सहजता जपण्यावर त्यांनी भर दिला आहे. छायाचित्रणाची जबाबदारीही त्यांनी तन्मय वनमाळी यांच्या साथीने सांभाळली आहे. पुण्यातील जुन्या वाड्याचे सौंदर्य, घरातील माणसांच्या आठवणी, वातावरणातील आपलेपणा आणि बदलत्या काळाचे प्रतिबिंब कॅमेऱ्यातून सुंदररीत्या टिपले आहे. या चित्रपटातील घर ही केवळ चार भिंतींची वास्तू राहत नाही, तर तेथील आठवणी, संस्कार, माणसांचे भावविश्व आणि नात्यांची ऊब जपणारी एक जिवंत व्यक्तिरेखा बनते. दृश्यांची मांडणी आणि प्रकाशयोजनेतून चित्रपटाला एक वेगळीच दृश्यात्मक श्रीमंती लाभली आहे.

चित्रपटाचे संगीतही विशेष उल्लेखनीय आहे. अविनाश-विश्वजीत यांनी संगीत आणि पार्श्वसंगीताची जबाबदारी उत्तमरीत्या सांभाळली आहे. गुरु ठाकूर यांचे अर्थपूर्ण गीतलेखन आणि राहुल देशपांडे तसेच शिवम सिंह यांचे स्वर चित्रपटाच्या भावविश्वाला अधिक समृद्ध करतात. विशेषतः दिगंबरा दिगंबरा हे गीत लक्षात राहते. राहुल देशपांडे यांच्या भारदस्त आणि भावपूर्ण आवाजामुळे या गीताला एक वेगळी उंची प्राप्त झाली आहे. गाण्याचे शब्द, संगीत आणि स्वर यांचा सुरेख संगम मनाला प्रसन्न करतो. पार्श्वसंगीतही प्रसंगांच्या भावनिक परिणामात भर घालते. संकलनाची जबाबदारी ऋषिराज जोशी यांनी सांभाळली असून, मानसी अत्तरदे यांची वेशभूषा व्यक्तिरेखांना साजेशी आहे. महेश कोरे यांचे कलादिग्दर्शन, प्राणम पानसरे यांचे ध्वनिसंकलन आणि आशिर्वाद हडकर यांचे डीआय कलरिंग यामुळे चित्रपटाचा तांत्रिक दर्जा अधिक उंचावतो.

आशिष निनगुरकर

या चित्रपटाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तो कोणत्याही एका पिढीला योग्य किंवा अयोग्य ठरवत नाही. उलट, प्रत्येक पिढीच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करतो. आजच्या धावपळीच्या आयुष्यात मोबाईल, करिअर, महत्त्वाकांक्षा आणि आर्थिक स्पर्धा यामध्ये आपण आपल्या जवळच्या माणसांसाठी वेळ काढायला विसरत आहोत. एकाच घरात राहूनही संवाद हरवतो आहे. ज्येष्ठांना त्यांच्या अनुभवांचा आदर हवा आहे, तर तरुणांना त्यांच्या स्वप्नांना समजून घेणारी साथ हवी आहे. या दोन्ही अपेक्षांमधील भावनिक दुवा आदि अनंत अतिशय सुंदरपणे जोडतो. काही वेळा एखादा संवाद, एखादी नजर किंवा एखादी छोटीशी कृती नात्याचा संपूर्ण अर्थ उलगडून दाखवते. चित्रपटातील अशा प्रसंगांमध्ये कलाकारांचा अभिनय, लेखकाची संवेदनशील लेखणी आणि दिग्दर्शकाची कल्पकता यांचा सुरेख मिलाफ अनुभवायला मिळतो.पॅनोरमा स्टुडिओज प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक, मुरलीधर छतवानी, समीर हंपी, महेश लिमये आणि अनिकेत मराठे यांनी केली आहे. रविंद्र औटी आणि दर्शन शाह हे सहनिर्माते आहेत. आशयपूर्ण कौटुंबिक चित्रपटाला उत्तम निर्मितीमूल्यांसह मोठ्या पडद्यावर आणण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

एकूणच, आदि अनंत हा केवळ एक चित्रपट नाही, तर आपल्या माणसांकडे नव्याने पाहायला शिकवणारा भावनिक अनुभव आहे. काही ठिकाणी कथानकाचा वेग संथ वाटत असला, तरी नात्यांच्या भावविश्वात रमणाऱ्या प्रेक्षकांसाठी ही कथा मनापासून अनुभवण्यासारखी आहे. अशोक सराफ यांचा अप्रतिम अभिनय, संकर्षण कऱ्हाडे यांची प्रभावी लेखणी आणि अभिनय, कलाकारांची उत्तम साथ, महेश लिमये यांचे संवेदनशील दिग्दर्शन आणि श्रवणीय संगीत या सगळ्यांमुळे चित्रपट मनात घर करतो. चित्रपटगृहातून बाहेर पडताना आपल्या घरातील आजी-आजोबा, आई-वडील आणि मुलांशी आणखी थोडा वेळ बोलावं, त्यांच्या भावना समजून घ्याव्यात, असं नक्कीच वाटतं. कारण नाती टिकवण्यासाठी मोठ्या गोष्टींची गरज नसते; गरज असते ती थोड्या संवादाची, प्रेमाची आणि एकमेकांना समजून घेण्याची. मराठी चित्रपटसृष्टीत नात्यांची सुंदर वीण गुंफणारा, काळजाला भिडणारे संवाद देणारा आणि दोन पिढ्यांमधील भावविश्वाचा अनोखा पट उलगडणारा आदि अनंत हा आवर्जून पाहावा असाच दर्जेदार कौटुंबिक चित्रपट आहे!

(लेखक, चित्रपट अभ्यासक, समीक्षक आणि पटकथाकार)

-आपलं महानगर वरुन साभार

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

घरफोडीच्या गुन्ह्यातील चार चोरटे जेरबंद;आठ लाखांचा ऐवज जप्त



नांदेड/प्रतिनिधी-भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घरफोडीचे गुन्हे करणाऱ्या चार आरोपींना भाग्यनगर पोलीसांनी अटक करुन ८ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

दिवाळी निमित्त अनेक कुटुंब घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी सह्याद्रीनगर, कार्तिकनगर व वर्धमाननगर येथे बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून लाखो रुपयांचा ऐवज चोरुन नेला होता. याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शोध पथकाचे फौजदार विनोद देशमुख व पोलीस कर्मचाऱ्यांनी आरोपींचा शोध सुरु केला होता. पोलीस पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन तपासाची चक्रे फिरवत तेजय दत्तात्रय सूर्यवंशी (वय २५) रा.मगनपूरा,नांदेड, स्वप्नील लक्ष्मण मुंडलोड (वय २४) रा.सरीकोट ता.धर्माबाद, गोविंद मनोज खंडागळे (वय १८) रा.सम्राट अशोकनगर,नांदेड, अक्षय रमेश इंगोले (वय २१) रा.जयभीमनगर,नांदेड या चार जणांना अटक केली. आरोपींकडून पोलीसांनी सोने व चांदीचे दागिणे, मोबाईल फोन, लॅपटॉप, दोन दुचाकी असा ८ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. आरोपींनी तीन घरफोडी केल्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

अवैध जड वाहतुकीमुळे सिडकोतील नागरिक त्रस्त

ॲड.प्रसेनजीत वाघमारे यांचा आंदोलनाचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी-सिडको परिसरातील रमाई आंबेडकर चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,लातूर फाटा या मार्गावरून सुरू असलेल्या अवैध जड वाहतुकीमुळे नागरिक आणि व्यापारी त्रस्त झाले आहेत. ही वाहतूक तात्काळ बंद करून पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ॲड.प्रसेनजित केरबा वाघमारे यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात सिडकोतील रमाई आंबेडकर चौक, संभाजी चौक, वसंतराव नाईक कॉलेज, यशोधरा नगर मार्गे लातूर फाट्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरून समृद्धी महामार्गाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात जड वाहनांची वाहतूक सुरू आहे. या वाहनांमुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अपघातांचा धोकाही वाढला आहे. १० नोव्हेंबर रोजी मध्यरात्री तीन वाजण्याच्या सुमारास विटांचा चुरा वाहून नेणाऱ्या एमएच २२ एएन ९९८९ क्रमांकाच्या हायवा वाहनाने एका घराला जोरदार धडक दिली. चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचा आरोप असून, या अपघातात घर पूर्णपणे पडले, तर लगतचे किराणा दुकानही उद्ध्वस्त झाले. या घटनेमुळे जड वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या गंभीर घटनेची दखल घेऊन समृद्धी महामार्गाच्या कामासाठी सुरू असलेल्या जड वाहनांच्या वाहतुकीवर कडक निर्बंध घालावेत, पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा आणि अपघातप्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे,अन्यथा, २० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जुन्या वसंतराव नाईक कॉलेजसमोर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विरोधात लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही ॲड. प्रसेनजित वाघमारे यांनी दिला आहे.

देगलूर येथील न्यायालयीन कर्मचारी संपात सहभागी

देगलूर/प्रतिनिधी-राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने मंगळवार दि.१७ नोव्हेंबर पासून संप पुकारला आहे. या संपात देगलूर येथील दिवाणी न्यायालय व कनिष्ठ स्तर न्यायालयातील कर्मचारी सहभागी झाले होते.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करावी, तसेच प्रलंबित मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, या मागणीसाठी राज्यभरातील न्यायालयीन कर्मचारी आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधत आहेत. दोन दिवस कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून निषेध आंदोलन केले. या आंदोलनाकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने न्यायालयीन कर्मचारी संघटनेने दि.१७ नोव्हेंबर पासून बेमुदत संप पुकारला आहे. राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा कर्मचारी महासंघाच्या वतीने व्यक्त करण्यात येत आहे. देगलूर येथील कर्मचाऱ्यांनीही या संपात सहभागी झाल्याने न्यायालयीन कामकाज ठप्प झाले आहे.

भोकर तालुक्यात शासकीय आरोग्य सेवा विस्कटली; प्राथमिक आरोग्य केंद्र,उपकेंद्रात डॉक्टरच नाहीत

भोकर/प्रतिनिधी-तालुक्यातील आरोग्य सेवा पूर्णतः विस्कटली असून ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवेचा कुठलाही लाभ मिळत नाही, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रातील डॉक्टर व कर्मचारी वेळेवर हजर राहत नाहीत रुग्णांना औषध गोळ्या देखील मिळत नाहीत तालुका आरोग्य अधिकाऱ्याच्या भोंगळ कारभारामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सेवेपासून वंचित राहावे लागत आहे.

भोकर तालुक्यात ४ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत मोघाळी,मातुळ, किनी, भोशी या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र असून मोघाळी प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार इमारती विना चालतो तेथील कर्मचारी वाऱ्यावरच आहेत , मातुळ प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत भव्य असून तिथे डॉक्टर व कर्मचाऱ्यांची नेमणूक नाही रुग्णांना काही उपचार मिळत नाहीत, भोशी व किनी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र कसेबसे चालू राहतात मात्र रुग्णांना औषध गोळ्या त्या ठिकाणी मिळत नाहीत अशा तक्रारी आहेत. शासकीय आरोग्य सेवेसाठी मोठ्या प्रमाणावर यंत्रणा कार्यरत असताना देखील रुग्णांना उपचार मिळत नसल्याने आरोग्य सेवेचा कारभारीत विस्कळीत झाला आहे नागरिकांना खाजगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागतो. भोकर तालुक्यात २२ उपकेंद्र मंजूर असून १९ कार्यरत आहेत बेंबर,भोशी, नारवट, पांडुरना, किनी, कोळगाव, पाळज, सोमठाणा, खरबी,दिवशी, लागळुद,मातुळ, रावणगाव, सोनारी, नागापूर, डौर, हाडोळी, हळदा, रायखोड, पाळज या ठिकाणी उपकेंद्र आहेत अनेक उपकेंद्रावर समुदाय अधिकारी डॉक्टर हजर राहत नाहीत काही उपकेंद्र बंद स्थितीमध्ये आहेत तिथे कोणी हजर राहत नाहीत या कर्मचाऱ्यावर कुणाचे नियंत्रण नाही समुदाय अधिकारी घरी बसूनच पगार उचलतात उपकेंद्रावर कधी हजर राहत नाहीत ग्रामीण भागातील रुग्णांना उपचार मिळत नाहीत औषध गोळ्या सुद्धा दिल्या जात नाहीत शासनाचा आरोग्य सेवेवर मोठा खर्च होऊन देखील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवेचा लाभ मिळत नाही खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावा लागतो ही अत्यंत दयनीय अवस्था आहे या सर्व आरोग्य सेवेच्या वाईट परिस्थितीला तालुका आरोग्य अधिकारी जबाबदार असून त्यांचे नियंत्रण नसल्याने तालुक्यातील आरोग्य सेवा पूर्ण विस्कळीत झाली आहे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तालुक्याच्या कारभारावर लक्ष देऊन गैरहजर राहणाऱ्या डॉक्टर व कर्मचाऱ्याविरुद्ध कार्यवाही करणे गरजेचे आहे.

नांदेड शहरात तीन दिवसांआड पाणीपुरवठा

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील विस्कळित पाणीपुरवठा, वारंवार होणारी पाणीगळती आणि नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत महापालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी मंगळवारी (दि.१७) सर्व विभागांतील अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. पाणीपुरवठा व्यवस्था तातडीने सुधारली नाही, तर संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबनासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचा इशारा त्यांनी दिला.दरम्यान, पाणीसाठ्याची स्थिती लक्षात घेता आठवडाभरानंतर शहरात तीन दिवसांआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन केले आहे.

बैठकीला अतिरिक्त आयुक्त, सर्व उपायुक्त, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शहर अभियंता आणि कनिष्ठ अभियंता उपस्थित होते. जलवाहिन्यांमधील गळती, वितरण व्यवस्थेतील त्रुटी आणि दुरुस्तीच्या कामांतील दिरंगाईचा आयुक्तांनी आढावा घेतला. वारंवार सूचना देऊनही कामात केवळ दोन ते चार दिवस सुधारणा होते आणि पुन्हा परिस्थिती जैसे थे होते असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. विष्णुपुरी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता सध्या दोन दिवसांआड होणारा पाणीपुरवठा आठवडाभरानंतर तीन दिवसांआड करण्यात येणार आहे. उत्तर आणि दक्षिण भागांत समान पाणीवाटप करण्यावर भर दिला जाणार असल्याचे आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी सांगितले.

वृत्तपत्र विक्रेत्यांना दिवाळी फराळाचे वाटप

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील तरोडा सेंटर येथील वृत्तपत्र विक्रेत्यांच्या वतीने १० नोव्हेंबर रोजी वृत्तपत्र विक्रेते आणि वाचकांना दिवाळीनिमित्त मिठाई व फराळाचे वाटप करण्यात आले. तरोडा सेंटरमधील कार्यक्षम वृत्तपत्र विक्रेते मारोती संभाजी गायकवाड, प्रशांत धाकपाडे, संजय पाटील, मारुती सूर्यवंशी आणि ज्येष्ठ सदस्य राजेश्वर लोकरे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. दररोज पहाटेपासून घरोघरी वृत्तपत्र पोचविणाऱ्या लाइनवरील बंधूंसह तरोडा सेंटरमधील एकूण ८० वृत्तपत्र विक्रेते व वाचकांना दिवाळी फराळ आणि मिठाईचे वाटप करुन शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमात हनमत माऊली, संतोष मोरे, संजय लोकडे, केरबा आणेराव, योगेश मुर्केवार, ज्ञानोबा नरवाडे, विजय कल्याणकर, राजेश राचा, सुभाष चव्हाण, बालाजी पावडे, भारत कळसे, नागनाथ वंगावार, राजू वंगलवार, नामदेवराव तिडके, प्रभाकर नरवाडे, दत्तात्रय कर्पे, गणेशराव येलत्रे, संघरत्न बुक्तरे, शिवाजी एकलारे, चेतन चौरी, संजय चलिंद्रवार, दशरथ पांचाळ, संदेश नरवाडे, ऋत्विक चौधरी, दीपक गंगाधर योगी आणि लक्ष्मीकांत पवार यांच्यासह अनेकांनी सहभाग घेतला.

कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरसाठी विशेष रेल्वे

नांदेड/प्रतिनिधी-कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपूर येथे जाणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत आदिलाबाद ते पंढरपूर दरम्यान विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला.

या विशेष रेल्वेगाड्यांमुळे महाराष्ट्राच्या मराठवाडा तसेच विदर्भातील भाविकांना पंढरपूर येथे जाण्यासाठी अतिरिक्त रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे. ही विशेष रेल्वे आदिलाबाद, किनवट, बोधडी बुजुर्ग, सहस्त्रकुंड, हिमायतनगर, हदगाव रोड, भोकर, मुदखेड, हजूर साहिब नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन आणि कुर्डुवाडी मार्गे पंढरपूरपर्यंत धावणार आहे. आदिलाबाद ते पंढरपूर विशेष रेल्वे (०७६२५) गुरुवारी (दि.१९) आणि सोमवारी (दि.२३) आदिलाबाद येथून सकाळी ७.१५ वाजता प्रस्थान करेल. किनवट, बोधडी बुजुर्ग, सहस्त्रकुंड, हिमायतनगर, हदगाव रोड, भोकर, मुदखेड, हजूर साहिब नांदेड, पूर्णा जंक्शन, परभणी जंक्शन, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी जंक्शन, मोडनिंब, पंढरपूर येथे मध्यरात्री १२.३० वाजता आगमन होईल. पंढरपूर ते आदिलाबाद विशेष (०७६२६) ही गाडी शुक्रवार (दि.२०) आणि मंगळवार (दि.२४) पंढरपूर येथून रात्री ८ वाजता प्रस्थान करेल. आणि आलेल्या मार्गानेच आदिलाबाद येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १२ वाजता आगमन करेल. प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन या रेल्वेला २४ डबे जोडण्यात येणार आहेत.

आर्य वैश्य महासभेच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी कोडगीरवार

उमरखेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी अभि. सुरेंद्र कोडगीरवार यांची नियुक्ती करण्यात आली. रविवार, दि.१५ नोव्हेंबर रोजी नागपूर येथील महाराजबाग येथे त्यांचा शपथग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या सोहळ्याला माजी मंत्री तथा आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार, महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, नागपूरचे दीपकभाऊ निल्लावार, महासचिव गोविंदराव बिडवई, संघटक प्रदीप कोकडवार यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत कोडगीरवार यांनी जिल्हाध्यक्षपदाची शपथ घेतली. यावेळी उमरखेड येथील समाज अध्यक्ष राजेश्वर रायेवार, महेश पत्तेवार, किरण मुक्कावार, वैभव कोडगीरवार, उदय पत्तेवार तसेच महागाव येथील ज्ञानेश्वर कापरत्वार, मनोज तगडपल्लेवार, कुणाल चक्करवार, संदेश मुत्तेपवार यांच्यासह जिल्ह्यातील अनेक समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रोहयोतून चारा पिकांसाठी आर्थिक मदत व रोजगार

नांदेड/प्रतिनिधी-दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात चारा पीक लागवडीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेंतर्गत विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अंतर्गत चारा पिकांच्या लागवडीसाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

या योजनेमुळे पशुपालकांना चारा उपलब्ध होण्यासोबतच ग्रामीण भागातील मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. त्यामुळे सिंचनासाठी पाणी उपलब्ध असलेल्या अधिकाधिक शेतकऱ्यांनी चारा पीक लागवड करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे. मृद व जलसंधारण विभागाच्या (रोहयो प्रभाग) ६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विविध चारा पिकांच्या लागवडीसाठी रोपे, बियाणे, मजुरी व सामग्री यासाठी आर्थिक तरतूद निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मका लागवडीसाठी हेक्टरी ४७ हजार ३०७ रुपये व ९५ मनुष्यदिवस, ज्वारीसाठी ४२ हजार ७७८ रुपये व ८८ मनुष्यदिवस, तर बाजरीसाठी ३५ हजार ५०५ रुपये व ७४ मनुष्यदिवस रोजगार उपलब्ध होणार आहे.

स्वाधार योजनेच्या अर्जांसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

नांदेड/प्रतिनिधी-भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पात्र विद्यार्थ्यांना नवीन अर्ज, नूतनीकरणाचे अर्ज तसेच प्रलंबित अर्जांतील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी ३० नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनुसूचित जातीतील ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण झालेल्या आणि समाजकल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन परिपूर्ण अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

महानगर पालिका क्षेत्रापासून पाच किलोमीटरच्या आत तसेच नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत आणि तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयांत प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांसाठी ही योजना राबविण्यात येते. विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर नवीन अर्ज भरावेत. नूतनीकरणासाठी पूर्वीचा वापरकर्ता क्रमांक व परवलीचा शब्द वापरून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज पूर्ण करावा. तसेच अर्जामध्ये त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे जोडून त्रुटींची पूर्तता निर्धारित मुदतीत करावी. मुदतीनंतर नूतनीकरणाचे अर्ज भरता येणार नसल्याने विद्यार्थ्यांनी विलंब न करता अर्जाची प्रक्रिया पूर्ण करावी व संकेतस्थळावर अर्जाची सद्यस्थिती तपासावी.

जागतिक शौचालय दिनानिमित्त जिल्ह्यात विशेष अभियान

नांदेड/प्रतिनिधी-जागतिक शौचालय दिनाचे औचित्य साधून १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात स्वच्छ शौचालय, गरिमामय भविष्य हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील सार्वजनिक, सामुदायिक तसेच शाळा व अंगणवाडीतील शौचालयांची स्वच्छता, सुरक्षितता आणि उपयुक्तता वाढविण्यासह प्रत्येक कुटुंबाने वैयक्तिक शौचालयाचा नियमित वापर करावा, यासाठी या अभियानात विशेष भर दिला जाणार आहे. या अभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागाच्या निर्देशानुसार हे अभियान राबविण्यात येत आहे. संयुक्त राष्ट्र संघाने यंदाच्या जागतिक शौचालय दिनासाठी सुरक्षित शौचालये, समान भविष्य ही संकल्पना निश्चित केली आहे. प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, स्वच्छ आणि सुलभ शौचालय सुविधा उपलब्ध व्हावी, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. अभियानांतर्गत ग्रामीण भागातील सार्वजनिक व सामुदायिक स्वच्छता संकुले, शाळा आणि अंगणवाड्यांमधील शौचालयांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती व सुधारणा करण्यात येणार आहेत. विशेषतः महिला, विद्यार्थिनी आणि दिव्यांग व्यक्तींना शौचालयांचा सुरक्षित व सुलभ वापर करता यावा, यासाठी आवश्यक सुविधांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. तसेच एक खड्डा असलेल्या शौचालयांचे दोन खड्ड्यांच्या शौचालयांमध्ये रूपांतर, सोकपिट नसलेल्या सेप्टिक टँकमध्ये सोकपिटची सुविधा आणि मैला गाळ व्यवस्थापन नियमांचे पालन याबाबतही गावकऱ्यांना माहिती दिली जाणार आहे. गावांचा हागणदारीमुक्त दर्जा कायम राखणे, शौचालयांचा नियमित वापर, साबणाने हात धुण्याची सवय रुजविणे आणि घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ बाबत जनजागृती करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाड्या, महिला बचत गट आणि ग्रामस्थांचा सहभाग घेतला जाणार आहे.

आ.भीमराव केराम यांनी बैठकीत घेतला आरोग्य विभागाचा आढावा

नागरिकांना आरोग्य सेवा व सुविधा देण्याच्या केल्या सुचना

किनवट/प्रतिनिधी-किनवट विधानसभा मतदारसंघातील आरोग्य यंत्रणेच्या काही ठिकाणच्या भ्रष्ट कारभारासह विविध कामकाजाचा ढासळता आलेख लक्षात घेता आयोजित केलेल्या आढावा बैठकीत आ.भीमराव केरामांनी सर्व समस्यांचे अवलोकन करून महत्वपूर्ण निर्णय घेतले. १७ नोव्हेंबर रोजी गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयातील बैठकीत विविध आरोग्य विभाग प्रमुखांशी संवाद साधत आरोग्य सेवा-सुविधांचा आढावा घेतला. रुग्णांना वेळेत आणि दर्जेदार उपचार मिळावा यासाठी प्रशासनाने सजग राहण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

गोकुंदा येथील उपरुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), प्रसूती विभाग, डायलिसिस विभाग, शस्त्रक्रिया विभाग तसेच इतर सर्व महत्त्वाच्या कक्षांची आ.केरामांनी बारकाईने पाहणी केली. दरम्यान मतदार संघातील सर्वच आरोग्य विभाग प्रमुखांकडून उपलब्ध सुविधा आणि साधनसामग्रीतून रुग्णांना मिळणाऱ्या सेवे विषयक परिस्थितीचे अवलोकन करून उणीवांच्या पुर्ततेसाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करून मागास किनवट व माहूर तालुक्यासाठी विशेष बाब म्हणून आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे भरीव आश्वासन दिले. रुग्णालयातील कामकाज अधिक गतिमान होण्यासाठी रुग्णसंख्याधारे वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपलब्धता, सद्यस्थितीत असलेली रिक्तपदे आणि वाढीव मनुष्यबळाच्या आवश्यकते बाबत आ.केराम यांनी सखोल माहिती घेतली. गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.मनोज घडसिंग, माहूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.बाबळे, मांडवी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.राजेश पवारांसह माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, संजय रेड्डी, नगरसेवक स्वागत आयनेनिवार, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, दिनेश रुणवाल आदी मान्यवरांसह पदाधिकारी उपस्थित होते. आरोग्य विभागातील समस्या मार्गी लावण्यासाठी आणि आवश्यक कामकाजासाठी आलेला करोडोंचा निधी स्वाहा करून फरार झालेला मांडवी ग्रामीण रुग्णालयातील तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.विक्रम राठोड अद्यापही पोलीस यंत्रणेच्या हाती लागलेला नसल्याचे वृत्त आहे. शासकीय सेवेत असताना कामकाज सांभाळणाऱ्यांवर कारवाई होणे अपेक्षित आहे. शेवटी प्रश्न आहे रुग्णसेवेचा. रुग्णसेवेपेक्षा कायद्याची किस काढत पळवाट काढणाऱ्यांवर सेवेला दांडी मारुन नांदेड येथून सुद्धा कारवाई केली तरच रुग्णसेवेत पारदर्शकता येईल. यासाठी आ. केरामांनी अधूनमधून अशा आढावा बैठका आणि पाहाणी दौरे करावीत या मागणीने जोर धरलाय.



सातारा जिल्हा बँक अध्यक्षपदी उंडाळकर तर उपाध्यक्षपदी चव्हाण

सातारा:सातारा जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे उदयसिंह पाटील-उंडाळकर तर शिवसेनेचे दीपक चव्हाण यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. या निवडीवेळी भाजपमधील अंतर्गत सुंदोपसुंदी मात्र चव्हाट्यावर आली. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे एकटे पडल्याचे चित्र यावेळी दिसले. दरम्यान, सातारा जिल्हा परिषदेतील सत्ता संघर्षाचा बदला राष्ट्रवादी आणि शिवसेनेने जिल्हा बँकेच्या पदाधिकारी निवडीत घेतल्याची प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात उमटत आहे.



प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांच्या वतीने नवामोंढा येथील बाजार समितीच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या अध्यात्मिक वक्त्या ब्रह्मकुमारी शिवानी दीदी यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

तरुणांसाठी गायरान जमिनीतील एक हेक्टर जागा देण्याची मागणी

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील बरबडा व पाटोदा येथील तरुणांना पोलीस व सैन्य भरतीची तयारी करण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवकांना व्यायाम व क्रीडा सरावासाठी मैदान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी दोन्ही गावांच्या हद्दीतील गायरान जमिनीच्या गट क्रमांक १६ मधून एक हेक्टर (१०० आर) जागा उपलब्ध करून देण्याची मागणी तहसीलदार, नायगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

बरबडा व पाटोदा ही दोन्ही गावे शेजारी असून या गावांमधील अनेक युवक पोलीस व सैन्य भरतीची तयारी करीत आहेत. मात्र, सरावासाठी स्वतंत्र मैदान उपलब्ध नसल्याने युवकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला व तरुणांना सकाळी मॉर्निंग वॉक, व्यायाम आणि कसरत करण्यासाठीही योग्य जागा उपलब्ध नाही. रस्त्यावर सकाळी व्यायाम व धावण्याचा सराव करताना वाहनांची वर्दळ असल्यामुळे अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन दोन्ही गावांतील नागरिकांच्या आरोग्याच्या आणि युवकांच्या भवितव्याच्या दृष्टीने मैदानाची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.बरबडा व पाटोदा येथील गायरान जमिनीच्या गट क्रमांक १६ मधील एकूण ७.१६ हेक्टर क्षेत्रापैकी एक हेक्टर (१०० आर) जागा अधिकृतरीत्या उपलब्ध करून देऊन त्या ठिकाणी आवश्यक सुविधा निर्माण कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी दिलेल्या या निवेदनावर भाजपाचे नायगाव तालुकाध्यक्ष श्री. बालाजी मोहनराव मेदवाड यांनी बरबडा व पाटोदा गावकऱ्यांच्या सोबत महसूल प्रशासनास निवेदन दिले आहेत. या मागणीवर महसूल प्रशासन काय निर्णय घेते, याकडे दोन्ही गावांतील युवक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

मुखेडमध्ये न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

मुखेड/प्रतिनिधी-न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी प्रलंबित वेतनवाढ आणि सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी मंगळवार, दि.१७ नोव्हेंबर पासून बेमुदत संप पुकारला आहे. या राज्यव्यापी संपात मुखेड येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत न्यायालयासमोर संप सुरु केला आहे.

दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२५ रोजी न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला होता. मात्र, २१ ते २२ महिने उलटूनही शासनाकडून याबाबत ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. प्रलंबित वेतनवाढीचा प्रस्ताव मंजूर करुन सुधारित वेतनश्रेणी तातडीने लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेवून संप मिटवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, संप किती दिवस चालणार, याबाबत अनिश्चितता असल्याने मुखेड न्यायालयात विविध कामांसाठी येणाऱ्या पक्षकार आणि नागरिकांचे लक्ष आता शासनाच्या निर्णयाकडे लागले आहे.

हानेगावच्या शासकीय रुग्णालयात रेबीज लसीचा तुटवडा

देगलूर/प्रतिनिधी-हानेगाव येथील शासकीय रुग्णालयात सध्या एक गंभीर आणि जीवघेणा प्रश्न निर्माण झाला आहे. रेबीजची लसच उपलब्ध नाही. कुत्रा चावलेल्या रुग्णांना लस घेण्यासाठी कर्नाटकात पाठवले जात असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

आधीच दुष्काळाने शेतकरी, मजूर, सर्वसामान्य जनता त्रस्त आहे. पाणी नाही, पीक नाही, हाताला काम नाही. त्यातच आता गावोगावी भटक्या कुत्र्यांचा हैदोस वाढला असून, कुत्रा चावला की जनता आणखी परेशान होत आहे. हानेगाव आणि परिसरातील गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून कुत्रा चावण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. लहान मुले, शाळकरी विद्यार्थी, शेतात जाणारे शेतकरी, सकाळी फिरायला जाणारे वृद्ध... कुणीही या भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यापासून सुरक्षित नाही. कुत्रा चावल्यानंतर रुग्ण धावत हानेगावच्या शासकीय रुग्णालयात येतो. पण तिथे गेल्यावर उत्तर मिळते - इथे रेबीजची लस नाही, तुम्ही कर्नाटकात जा. गरीब रुग्णाने कुठे जायचे? पैसा कुठून आणायचा? वेळेवर लस नाही मिळाली तर रेबीजसारखा जीवघेणा आजार होऊ शकतो, हे माहीत असूनही प्रशासनाला याचे गांभीर्य का नाही, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. आधीच दुष्काळ असून त्यात कुत्रा चावला तर लस घ्यायला कर्नाटकात जावे लागते. भाड्याला पैसा नाही, वेळेत लस नाही मिळाली तर आमचा जीव धोक्यात येतो. आम्ही जगायचं कसं? अशी व्यथा एका रुग्णाच्या नातेवाईकाने व्यक्त केली. रेबीजची लस ही वेळेवर घेणे अत्यंत आवश्यक असते. कुत्रा चावल्यानंतर २४ तासांच्या आत लस घेणे गरजेचे असते. मात्र हानेगावात लस नसल्याने रुग्णांना देगलूर, उदगीर किंवा थेट कर्नाटकातील औराद, बिदर येथे जावे लागते. एका बाजूला बसला पैसा नाही, दुसऱ्या बाजूला खाजगी दवाखान्यात लसीसाठी हजारो रुपये मोजावे लागतात. गरीब माणसाने करायचे काय? अनेक रुग्ण लस न घेता घरी परतत आहेत, ज्यामुळे त्यांचा जीव धोक्यात आला आहे. दुष्काळामुळे गावांमध्ये अन्नाचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे भटकी कुत्री अधिक आक्रमक झाली आहेत. गावातील कचरा, उघड्यावर टाकलेले अन्न यामुळे कुत्र्यांची संख्या वाढत आहे. नगर पालिका, ग्रामपंचायत यांच्याकडून भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांना तर कुत्र्यांमुळे जीव मुठीत घेऊन जावे लागते. पालक आपल्या मुलांना शाळेत सोडायला जाताना भीती व्यक्त करत आहेत.

कुलगुरु डॉ.चासकर यांच्याकडून हिवाळी परीक्षेच्या केंद्रांची पाहणी

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या हिवाळी परीक्षा २०२६ च्या अनुषंगाने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांनी विद्यापीठाशी संलग्नित पाच महाविद्यालयांतील परीक्षा केंद्रांना आज अचानक भेट देऊन परीक्षा व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली.

या दौऱ्यामध्ये ग्रामीण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वसंतनगर (कोटग्याळ), श्री संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोहा, श्री शिवाजी महाविद्यालय, कंधार, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड आणि शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड या परीक्षा केंद्रांची पाहणी करण्यात आली.या पाहणी दरम्यान कुलगुरूंनी परीक्षा कक्षांमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था, ऑनलाइन प्रश्नपत्रिका डाउनलोड करण्याची प्रक्रिया, उत्तरपत्रिकांचे संकलन व सीलबंद करण्याची कार्यपद्धती तसेच परीक्षेच्या सुरळीत संचालनासाठी आवश्यक असलेल्या इतर सुविधांची तपासणी केली.

पान १ वरुन

जुन्या निकालांचा चुकीचा अर्थ;...

शिंदे गटाने केला. त्यामुळे केवळ बैठकीला गैरहजर राहिल्याच्या कारणावरून आमदारांना अपात्र ठरवता येणार नसल्याची भूमिका मांडण्यात आली.दरम्यान, विधानसभा अध्यक्षांच्या १० जानेवारी २०२४ रोजीच्या निर्णयाला ठाकरे गटाने आव्हान दिले असून, निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह दिल्याच्या निर्णयाचाही न्यायालयीन वाद सुरू आहे. शिंदे गटाचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर ठाकरे गटाकडून प्रतिवाद मांडला जाणार आहे. त्यामुळे या सुनावणीत दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि सर्वोच्च न्यायालयाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

२२ जणांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड; १० जणांवर यशस्वी शस्त्रक्रिया

रयत सेवाभावी संस्थेचा स्तुत्य उपक्रम

नायगाव/प्रतिनिधी-एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, त्यांच्या समस्या जाणून घेऊन न्याय मिळवून देणे तसेच आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रयत सेवाभावी संस्था, सुजलेगाव यांच्या वतीने शुक्रवार, दि.१३ नोव्हेंबर रोजी सुजलेगाव येथे जनसुनावणी व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. कालवश अनुसयाबाई व रावसाहेब गंगाराम सूर्यकार यांच्या स्मृतिदिनानिमित्त ग्रासरूट नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमात २० एकल महिलांचे निराधार योजनेचे अर्ज पूर्ण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉ. देवराव आईलवार होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सत्यभामा सौंदरमल व समतादूत दिलीप सोंडारे, तर प्रमुख अतिथी म्हणून दत्ता तुमवाड व दिगंबरराव जाधव उपस्थित होते. तहसीलदारांचे प्रतिनिधी म्हणून गुरुराज कदम यांची उपस्थिती होती.जनसुनावणीत एकल महिलांनी निराधार योजनेचे अर्ज, आवश्यक कागदपत्रे, वयाचे प्रमाणपत्र आणि शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी मांडल्या. यावेळी २० महिलांचे अर्ज भरून पूर्ण करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख यांनी वयाच्या प्रमाणपत्रांवर स्वाक्षरी करून सहकार्य केले. सत्यभामा सौंदरमल यांनी महिलांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न तसेच संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार याविषयी मार्गदर्शन केले. समतादूत दिलीप सोंडारे यांनी बार्टीच्या विविध योजनांची व अर्जप्रक्रियेची माहिती दिली. लक्ष्मण हजारे यांनी एकल महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. यावेळी एकल महिला आहिल्याबाई शेळके यांनीही आपले अनुभव मांडले. स्मृतिदिनानिमित्त आयोजित मोफत आरोग्य व नेत्रतपासणी शिबिरात १२ एकल महिला आणि १० पुरुष अशा एकूण २२ जणांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. त्यापैकी १० जणांवर आतापर्यंत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. उर्वरित लाभार्थ्यांच्या शस्त्रक्रियाही नियोजनानुसार करण्यात येणार आहेत. महिलांची आरोग्य तपासणी करून औषधांचे वाटप करण्यात आले. या शिबिरासाठी डॉ.आर.के. मुनेश्वर, आरोग्य सेविका गायकवाड, आरोग्य सहा. जी.सी.गौंड व अर्चना कोंचमवाड यांनी परिश्रम घेतले. लायन्स हॉस्पिटल, जंगमवाडी, नांदेड येथील वैद्यकीय पथकाने मोफत शस्त्रक्रियेसाठी सहकार्य केले. कार्यक्रमाची सुरुवात संविधानिक मूल्ये, हुंडाबंदी व दारूबंदी या विषयांवरील प्रबोधनात्मक शाहिरीने झाली. शाहीर दिगू तुमवाड व त्यांच्या कलापथकाने सामाजिक परिवर्तन आणि व्यसनमुक्तीचा संदेश दिला. सपना टोमके व समता फेल्लो माधव पवार यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. इरवंत आ.रा.सूर्यकार यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याची माहिती दिली. सपना भीमराव टोमके यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.यावेळी सरपंच दत्ता आईलवार, रामचंद्र नेहरू, बालाजी सूर्यकार, रंजितदादा बाऱ्हाळीकर, लक्ष्मण हजारे, विलास मगरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी, आधार महिला मंडळ व सोबती गटाचे सदस्य आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पान १ वरुन

कापूस-तुरीच्या आड गांजाची...

मात्र, या कारवाईने केवळ एका शेतातील गांजाची लागवड उघड झाली असे समजून विषय संपवता येणार नाही. कारण दहेगाव आणि दत्तमांजरी या दोन ठिकाणी अवघ्या दोन दिवसांत गांजाची शेती सापडणे हा निव्वळ योगायोग आहे की तालुक्यात अमली पदार्थांच्या उत्पादनाचे एखादे मोठे जाळे कार्यरत आहे, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. मागील काही दिवसांपासून तालुक्यात अमली पदार्थांच्या अवैध विक्रीचा गोरखधंदा सुरू असल्याची चर्चा या कारवायांनंतर पुन्हा जोर धरू लागली आहे. गांजाची लागवड, त्याचे उत्पादन आणि त्यानंतर सोयीस्करपणे होणारी विक्री, अशी साखळी कार्यरत असल्याचीही चर्चा नागरिकांमध्ये आहे.गांजाची शेती करणारे शेतकरी केवळ स्वतःच्या वापरासाठी किंवा स्थानिक पातळीवर विक्रीसाठी उत्पादन घेत होते की त्यामागे गांजाची खरेदी-विक्री करणाऱ्या टोळ्यांचे जाळे आहे, याचा तपास होणे गरजेचे आहे. दोन दिवसांत दोन ठिकाणी गांजाची शेती उघडकीस येणे म्हणजे या अवैध धंद्याचे धागेदोरे केवळ शेतापुरते मर्यादित नसण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, विक्रीचे जाळे, संभाव्य खरेदीदार आणि पुरवठा साखळी याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे पोलिसांनी लागवड करणाऱ्यांपुरती कारवाई मर्यादित न ठेवता या धंद्याच्या मुळापर्यंत पोहोचण्याची मागणी होत आहे.

'लश्कर'चा कमांडर...

सहभाग असल्याचा आरोप होता. किश्तवाड जिल्ह्यातील दोन पोलीस अधिकाऱ्यांच्या हत्येच्या प्रकरणातही त्याचे नाव समोर आले होते. लश्करची प्रॉक्सी संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'द रेझिस्टन्स फ्रंट'च्या नावानेही तो कारवाया करत असल्याची माहिती तपास यंत्रणांकडे होती. कुलगाममधील या कारवाईमुळे दक्षिण काश्मीरमधील दहशतवादी संघटनांच्या हालचालींना मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. दरम्यान, फरार दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा यंत्रणांकडून परिसरात पुढील तपास आणि शोधमोहीम सुरू ठेवण्यात येत आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४